नवभारत
पुणे, शुक्रवार, दि.०२ जुलै २०२१

# 15 से 18 जुलाई तक संत साहित्य उच्च शिक्षा परिषद

## MIT वर्ल्ड पीस यूनि. का कार्यक्रम

■ **पुणे,** (सं.) एमआईटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी, पुणे और श्रीक्षेत्र आलंदी -देहू परिसर विकास समिति, आलंदी के संयुक्त तत्वावधान में पहली 'भारतीय संत साहित्य उच्च शिक्षा परिषद' 15 से 18 जुलाई के दरमियान ऑनलाइन की जाएगी. 15 जुलाई की दोपहर 2 बजे सम्मेलन का उद्घाटन होगा. जिसमें भारतीय संत साहित्य को उच्च शिक्षा में शामिल करने के लिए समय की आवश्यकता है विषय पर विचार रखे जाएंगे. वहीं समापन सत्र 18 जुलाई की शाम 4.30 बजे होगा.



सम्मेलन में शिक्षा विशेषज्ञ, दार्शनिक और संत साहित्य के विद्वान अपने विचार प्रस्तुत करेंगे. संयोजन समिति के अध्यक्ष जगदगुरू तत्वज्ञ संत तुकाराम महाराज के वंशज हभप बापूसाहेब मोरे और विख्यात कीर्तनकार एवं प्रवचनकार हभप रविदास महाराज शिरसाट कार्यावाहक के रूप में कार्य करेंगे. कार्याध्यक्ष राहुल कराड की अवधारणा एवं यूनिवर्सिटी के अध्यक्ष विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड के मार्गदर्शन में सम्मेलन का आयोजन होगा.

### छह विषयों पर रखे जाएंगे विचार

इन चार दिनों में छह विषयों पर विचार रखे जाएंगे.जिनमें संत साहित्य समृध्द जीवन जीने का आधुनिक विज्ञान, वारकरी संप्रदाय के विचार : आधुनिक समाप्ति, क्या भारतीय शिक्षाशास्त्र ने भारतीय संतत्व को विकसित किया, स्वास्थ्य प्रबंधन, हमारे दार्शनिक संतों को किसने धार्मिक बनाया और भारतीय शिक्षा पाठ्यक्रम में भारतीय संत गौण क्यों है शामिल हैं.

दैनिक
# नांदेड एकजूट
नांदेड, शुक्रवार, दि.०२ जुलै २०२१

## एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे

# पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद

पुणे : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, दि. १५ जुलै २०२१ ते रविवार, दि. १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन गुरूवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होईल. या सत्राचा विषय भारतीय संतसाहित्याचा उच्चशिक्षणात समावेश काळाची गरज' हा आहे. समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल.

या चार दिवसीय सत्रांमध्ये सहा सत्रे असतील

१. संतसाहित्य - समृद्ध जीवन जगण्याचे आधुनिक शास्त्र

२. वारकरी संप्रदाय विचार : आधुनिक की कालबाह्य

३. भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षणपद्धतीने केले काय?

४.संत आणि आरोग्य व्यवस्थापन

५. आमच्या तत्त्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले?

६. भारतीय शिक्षण अभ्यासक्रमात भारतीय संत गौण का?

परिषदेमध्ये नामवंत शिक्षण तज्ञ, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रवचनकार, तत्वज्ञ आणि संत साहित्याचे अभ्यासक आपले विचार मांडतील.

या पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष जगद्गुरु तत्त्वज्ञ संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. श्री. बापूसाहेब मोरे आणि सुप्रसिध्द कीर्तनकार व प्रवचनकार आणि हाडाचे निष्ठावंत वारकरी ह.भ.प. श्री. रविदास महाराज शिरसाट हे कार्याध्यक्ष म्हणून कार्य करणार आहेत.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांची संकल्पना आणि पुढाकार आणि विद्यापीठाचे अध्यक्ष विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद संपन्न होईल.

भारतीय संत साहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे. म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती आणि श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. हा हेतू ठेवून, चार दिवसांची ही परिषद पान ४ वर >>

## एमआयटी वर्ल्ड पीस...

आयोजित करण्यात आली आहे.या परिषदेत ज्या कीर्तनकार, प्रवचनकार आणि विणेकरांना सहभागी व्हायचे असेल, त्यांनी शालीकराम महाराज खंदारे मो.९८५००७४२०३, महेश महाराज नलावडे मो. ९८२२५४७७२७ किंवा रामचंद्र महाराज इंगोले यांच्याशी ९३०९८२४७४० मोबाइलवर संपर्क साधून नाव नोंदणी करावी, असे आवाहन पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे समन्वयक डॉ. संजय उपाध्ये यांनी केले आहे.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

दैनिक
सत्यमत
**लातूर, शुक्रवार, दि.०२ जुलै २०२१**

# एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी तर्फे १५ जुलै रोजी संतसाहित्य परिषद

**पुणे** : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्री-क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, दि. १५ जुलै २०२१ ते रविवार, दि. १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन गुरूवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होईल. या सत्राचा विषय 'भारतीय संतसाहित्याचा उच्चशिक्षणात समावेश काळाची गरज' हा आहे. समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल.

या चार दिवसीय सत्रांमध्ये सहा सत्रे असतील. १. संतसाहित्य - समृद्ध जीवन जगण्याचे आधुनिक शास्त्र, २. वारकरी संप्रदाय विचार : आधुनिक की कालबाह्य, ३. भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षणपद्धतीने केले काय?, ४.संत आणि आरोग्य व्यवस्थापन, ५. आमच्या तत्त्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले?, ६. भारतीय शिक्षण अभ्यासक्रमात भारतीय संत गौण का?

परिषदेमध्ये नामवंत शिक्षण तज्ञ, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रवचनकार, तत्वज्ञ आणि संत साहित्याचे अभ्यासक आपले विचार मांडतील. या पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष जगद्गुरु तत्त्वज्ञ संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. श्री. बापूसाहेब मोरे आणि सुप्रसिध्द कीर्तनकार व प्रवचनकार आणि हाडाचे निष्ठावंत वारकरी ह.भ.प. श्री. रविदास महाराज शिरसाट हे कार्याध्यक्ष म्हणून कार्य करणार आहेत. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांची संकल्पना आणि पुढाकार आणि विद्यापीठाचे अध्यक्ष विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद संपन्न होईल.

भारतीय संत साहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे अस-लेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे.

म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्व-ज्ञान, भक्ती आणि श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. हा हेतू ठेवून, चार दिवसांची ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेत ज्या कीर्तनकार, प्रवचनकार आणि विणेकरांना सहभागी व्हायचे असेल, त्यांनी शालीकराम महाराज खंदारे मो.९८५००७४२०३, महेशमहाराज नलावडे मो. ९८२२५४७७२७ किंवा रामचंद्र महाराज इंगोले यांच्याशी ९३०९८२४७४० मोबाइलवर संपर्क साधून नाव नोंदणी करावी. असे आ-वाहन पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे समन्वयक डॉ. संजय उपाध्ये यांनी केले आहे.